फ्रेडरिक डग्लस

गुलामगिरीचे शेवटचे दिवस

लेखक: विल्यम मिलर; चित्रे: सेड्रीक ल्युकास



फ्रेडरिक डग्लस

गुलामगिरीचे शेवटचे दिवस

मराठी अनुवादः सुशील मेन्सन





फ्रेडरिक डग्लस एक गुलाम म्हणून जन्माला आला. आपले पिता कोण, हे त्याला कधीच कळले नाही. आपल्या आईलासुद्धा त्याने फक्त काही वेळाच पाहिले. त्याची आई चंद्रप्रकाशात थंडीने गोठलेल्या जंगलातून रात्रभर चालत अनेक शेते पार करून त्याला भेटायला येत असे.

रात्रभर ती चालत राहायची, आपल्या बाळाला एकदा कवेत घ्यायला मिळावे म्हणून. फ्रेडरिकला तिचा तो चेहरा आयुष्यभर लक्षात राहीला: तिची गडद काळी त्वचा, मायेने आसुसलेले डोळे, तोंडावर कायम दिसणारे प्रेमळ स्मित.






फ्रेडरिकला त्याच्या आजीने वाढवले. तिने त्याला सांगितले की तो त्याच्या आईला पुन्हा कधी पाहू शकणार नाही, कारण तिच्या मालकाने तिला कित्येक मैल दूर राहाणाऱ्या दुसऱ्या एका मालकाला विकले होते. फ्रेडरिकने परिस्थिती स्वीकारण्याचा प्रयत्न केला, पण जेव्हा कधी त्याच्या मनात आईचे विचार येत तेव्हा त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागत.


लवकरच त्याला कळून चुकले की मुलांनासुद्धा शेतात काम करावे लागते. त्यालाही मोठ्या मुलांमागे चालत मक्याच्या रोपट्यांदरम्यान उगवलेले तण उपटून काढायचे काम करावे लागले. फक्त शनिवारीच त्याला काही तास खेळायची परवानगी मिळाली. पण फ्रेडरिक लाजाळू होता आणि इतर मुलांसोबत खेळणे त्याला पसंत नव्हते. तो फक्त आपल्या आईचाच विचार करत बसे – आई आपल्याला सोडून का गेली, आपण गुलाम का आहोत, आपले मालक मालक का आहेत असे प्रश्न त्याला पडू लागले.



फ्रेडरिकला सभोवती भेदरलेले लोक दिसले: पुरुष आणि स्त्रिया नेहमी माना खाली झुकवून चालत असत.




ते तोंडातून एकही शब्द काढत नसत. त्यांचा सुपरवायझर जवळ असे तेव्हा तर ते कुजबूजही करत नसत.




तरीही सुपरवायझर त्यांना मारत असे. एकदा, फ्रेडरिकने पाहिले की सुपरवायझर मालकाच्या आवडत्या गुलामाला चाबकाचे फटके मारत होता. तो म्हातारा गुलाम थोडासा जास्त वेळ झोपून राहिला होता.

त्यामुळे तो मालकाच्या घोड्याची काळजी घ्यायला विसरला. फ्रेडरिकला ते चाबकाचे फटके आपल्याच पाठीवर बसत आहेत असे वाटले. त्याला वाटले जणू आसपासच्या सगळ्याच गुलामांच्या पाठींवर चाबकाचे फटके बसतायत.




त्या रात्री फ्रेडरिक शेकोटीजवळ पडून होता तेव्हा त्याने पळून जाण्याची योजना बनवली. तो उत्तर भागात पळून जाण्याची स्वप्ने बघू लागला. कारण तेथील शहरांमध्ये काळ्या लोकांना गोऱ्या लोकांचे भय नव्हते. एक नाव चोरायची, ती नदीतून चालवत समुद्रात न्यायची आणि तिथून न्यूयॉर्क शहरात पोहोचायचे अशी स्वप्ने तो बघू लागला. स्वप्ने बघण्याशिवाय तो दुसरे काही करू शकला नाही.




फ्रेडरिक मोठा होत गेला, बळकट होत गेला तसे त्याचा मालक त्याच्याकडून अधिकाधिक कामाची अपेक्षा करू लागला. पानगळीच्या ऋतूत, काहीवेळा फ्रेडरिक मध्यरात्रीपर्यंत शेतात काम करत असे.



मग पहाटेचे पहिले किरण दिसू लागताच तो पुन्हा मक्याच्या वा कापसाच्या शेतात काम करत असे.






फ्रेडरिक सतरा वर्षांचा असताना त्यांच्या शेतावर एक नवा माणूस, *कोवी*, आला. कोवी गुलामांचे खच्चीकरण करण्याचे काम करत असे.

कुणा पुरुष वा स्त्री गुलामाने पळून जायचा प्रयत्न केला वा तसे स्वप्न पाहू लागला की कोवी त्याचा आत्मविश्वास खच्ची करत असे.

कोवीला फ्रेडरिक इतर गुलामांसारखा वाटला नाही. फ्रेडरिकला एकटे राहायला आवडे. गुलामांच्या आरामाच्या वेळेत फ्रेडरिक गवतावर पडून वाचन करत असे. फ्रेडरिकला लवकरच खच्ची करायला हवे, हे कोवीला जाणवले. तसे केले नाही तर तो इतर गुलामांना वाचन करायला आणि स्वत:साठी विचार करायला शिकवेल, ही भीती होती.

मग कोवी फ्रेडरिकवर कडक नजर ठेवू लागला. इतर गुलामांच्या तुलनेत फ्रेडरिकचे खच्चीकरण करणे हे काम दुप्पट कठीण होते. फ्रेडरिक दुपारी जेवण घ्यायला बसे तेव्हाही कोवी थंड नजरेने त्याच्यावर देखरेख करत बसे.



एके दिवशी, फ्रेडरिक तंबाखूच्या गोदामात काम करत होता. त्या दिवशी खूप उष्मा होता, त्यामुळे फ्रेडरिक लवकर थकून गेला. मग तो अंधाऱ्या गोदामातून बाहेर उजेडात आला आणि चक्कर येऊन ओकच्या झाडाखाली पडला. कोवीने फ्रेडरिकला लगेच उठून काम संपवण्याचा आदेश दिला.


फ्रेडरिकने कोवीला समजावण्याचा बराच प्रयत्न केला पण कोवीने त्याचे काहीही ऐकून घेतले नाही.

मग फ्रेडरिकला त्याच्या डोक्यावर छडीचे तीव्र प्रहार जाणवले. फ्रेडरिक गोदामात परतेपर्यंत कोवी त्याला मारतच होता.

त्या रात्री फ्रेडरिक पळून गेला. तो गर्द जंगलात लपून बसला. जंगली बोरे खाऊन, उथळ झऱ्यातील पाणी पिऊन त्याने तहानभूक भागवली.

आपण शेतावर परतलो तर आपल्याला बेदम मारतील आणि कदाचित ठारही मारून टाकतील, हे तो जाणत होता. इतके भय आणि एकाकीपणा त्याने आजवर कधी अनुभवला नव्हता.

अंधाऱ्या जंगलात पडल्या पडल्या फ्रेडरिकला वाटू लागले की आपण केसाळ नखे असलेले जनावर असतो तर स्वतःचे संरक्षण करू शकलो असतो, पक्षी असतो तर झाडांच्या शेंड्यांवरून उडून आणि समुद्राच्या वर आभाळात घिरट्या घालून स्वतःला वाचवू शकलो असतो.





सूर्य वर आल्यावर, कुणीतरी आपल्याच दिशेने येत असल्याचे फ्रेडरिकला ऐकू आले. तो पळण्याच्या तयारीत असतानाच त्याला *सँडी* नावाचा साथीदार गुलाम दिसला. सँडी दयाळू होता. फ्रेडरिकने त्याला आपल्याला दिलेल्या माराची कहाणी सांगितली. सँडी त्याला घरी घेऊन गेला. शेकोटीसमोर त्याने फ्रेडरिकच्या जखमा स्वच्छ केल्या आणि त्याला भाजलेले कणीस खायला दिले.




सँडी आफ्रिकेचा जादुटोणा जाणत होता. जहाजांतून अमेरिकेत आणलेल्या आफ्रिकी गुलामांनी हे ज्ञान आणले होते. सँडीने फ्रेडरिकला एक जादुची मुळी दिली. ती कोवीच्या चाबकाच्या फटक्यांपासून फ्रेडरिकचे रक्षण करणार होती. जीव वाचणार असेल तर फ्रेडरिक जादुटोण्यावरही विश्वास ठेवायला तयार होता.


जेव्हा फ्रेडरिक शेतावर परतला तेव्हा कोवीने त्याला चाबकाचे फटके देण्याच्या जागेवर बोलावले.

फ्रेडरिकने कोवीच्या डोळ्यांत क्रोध पाहिला. कोणतीच जादू आपल्याला वाचवू शकत नाही, हे त्याला कळून चुकले. त्याला जाणीव झाली की कुणीही असो, माणूस वा गुलाम, त्याला स्वतःचे रक्षण स्वतःच करायला हवे.

कोवीने गाठ असलेल्या चाबकाने फ्रेडरिकच्या छातीवर फटका मारला.


दुसरा फटका चुकवण्यासाठी फ्रेडरिकने आपला हात उचलला आणि मग दोघांच्यात मारामारी सुरू झाली.





जेव्हा ते एकमेकांशी मारामारी होते, एकमेकांना लाथा आणि ठोसे मारत होते, जमिनीवर कुस्ती करत होते तेव्हा इतर गुलाम ते दृश्य अविश्वासाने बघत होते.

याआधी कधी त्यांनी एखाद्या गुलामाला स्वत:चा बचाव करताना पाहिले नव्हते. एवढे धैर्यही त्यांनी कधी बघितले नव्हते.



मारामारी संपल्यावर, कोवीने फ्रेडरिककडे वेगळ्याच दृष्टीने पाहिले. कोवीच्या डोळ्यांत भय होते, पण आदरही होता. फ्रेडरिकला जाणीव झाली की कोवी आता पुन्हा कधीच त्याला मारणार नाही. कोवी हे कधीच स्वीकार करू शकणार नव्हता की एका गुलामाने त्याच्याशी मारामारी केली होती, त्याचे तो खच्चीकरण करू शकला नव्हता.



त्या रात्री शेकोटीजवळ पडला असताना फ्रेडरिकला आईची आठवण आली. त्याला कवेत घेण्यासाठी ती गोठवून टाकणाऱ्या थंडीत अनेक शेते पार करून रात्रभर चालली होती, हे त्याला आठवले. त्याने ठरवले की आपण कधीही गुलामासारखा विचार करायचा नाही, गुलामासारखे काम करायचे नाही. त्याने आईला वचन दिले की तो मुक्त झाल्यावर इतर गुलामांनाही मुक्त करेल.

फ्रेडरिकने आभाळाकडे पाहिले. ढगांमधून चंद्र हळूहळू पुढे वाहात होता.

चंद्रानंतर एक तारा उगवला, पिवळा आणि खूप दूर, पण तो आकाशात जळत होता.

लेखकाचे मनोगत

फ्रेडरिक डग्लसचा जन्म 1817 साली एक गुलाम म्हणून झाला. आपले पिता कोण, हे त्याला माहीत नव्हते. त्याने आपल्या आईला तिच्या मृत्युपूर्वी फक्त काही वेळाच पाहिले होते. फ्रेडरिकच्या मालकाच्या पत्नीने त्याला वाचन करायला प्रोत्साहन दिले. पुस्तक वाचण्याचे आणि शिकण्याचे वेड त्याला याच काळात लागले आणि ते आयुष्यभर टिकले.

1838 साली, फ्रेडरिक उत्तर भागात पळाला. त्याने गुलामगिरीविरोधी आंदोलनात एक वक्ता म्हणून प्रसिद्धी मिळवली. 1845 साली, त्याने आपले आत्मचरित्र *द नरेटीव्ह ऑफ लाईफ ऑफ फ्रेडरिक डग्लस: ॲन अमेरिकन स्लेव्ह* प्रकाशित केले. इतर कोणत्याही पुस्तकाच्या तुलनेत या पुस्तकाने अमेरिकी समाजाला गुलामगिरी प्रथेतील क्रुरता समजून घेण्यास मदत केली.

फ्रेडरिकने नंतर आपल्या आत्मचरित्राचे आणखी काही भाग लिहिले. 1895 साली मृत्युपर्यंत, तो आपल्या लोकांच्या मुक्तीसाठी संघर्ष करत राहिला.



समाप्त